**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**मुंबई पोर्ट ट्रस्ट, ठाकरसी हाऊस, तिसरा मजला,**
**शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**

**ई मेल** - aao.hrms@mahakosh.in **संकेत स्थळ** - www.mahakosh.in

क्र.संलेको/०५-२०२०/प्रशा-सलेअ-राप/न.क्र.१२३/प्रशा बदली/ 279 दि. 19 JUN 2020

विषय - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट - ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकारी यांच्या बदलीबाबत.

संदर्भ - १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.१३१/कोषा प्रशा-३, दि.३०/५/२०१५.
३) संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/०५-२०१९/प्रशा-सलेअ-राप/सअ-१/न.क्र.३/८०%सरळसेवा २०१९/३६४, दि. २९/०५/२०१९.
४) आयुक्त कृषी म. रा. तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, म. रा., पुणे यांचे पत्र जा.क्र./वपाविय/सहाय्यक लेखा अधिकारी/२०२०/पुणे/१३६८, दि.२२/०५/२०२०.

## आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट - ब (राजपत्रित) संवर्गातील खालील नमुद अधिकारी यांची संदर्भ क्र. ३ वरील आदेशान्वये खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र. २ मध्ये नमुद कार्यालयात नियुक्ती करण्यात आली होती.

संदर्भ क्र. ४ वरील पत्रान्वये आयुक्त कृषी म. रा. तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरील कार्यालयाअंतर्गत सुरु असलेले प्रकल्प पुर्ण झाले असल्याचे तसेच उर्वरीत सुरु असलेल्या प्रकल्पांचे कामकाज जिल्हास्तरीय कार्यालयामार्फत करणे शक्त असल्याचे कळविले आहे. तसेच प्रशासकीय खर्च मार्यादित ठेवण्याच्या दृष्टीने सदर नियुक्त केलेल्या अधिकारी यांची दि. ३०/०६/२०२० पर्यंत अन्यत्र बदली करण्याबाबत कळविले आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदलीचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार व संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट - ब (राजपत्रित) संवर्गातील सदर कार्यालयात कार्यरत असलेल्या खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र. २ मध्ये नमुद अधिकाऱ्यांची स्तंभ क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव पदनाम व कार्यरत कार्यालय | बदली करण्यात आलेले पद व कार्यालयाचे नाव व ठिकाण | रकाना क्र. ३ मधील पद उपलब्ध होण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीम. मेघश्री मोहन कोरगावकर,<br>सहाय्यक लेखा अधिकारी,<br>वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,<br>अमरावती. | उपकोषागार अधिकारी,<br>जिल्हा कोषागार कार्यालय,<br>अमरावती | श्री. हरीश कृष्णालाल संतोषीया यांच्या सेनि दि.३१.०३.२०२० ने रिक्त |

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे व तसे संचालनालयास अवगत करावे.

संबंधीत अधिकाऱ्यांच्या सध्याच्या पदावरील तसेच बदलीच्या पदावरील कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त अधिकाऱ्यांना कार्यमुक्त व रुजु करुन घेण्यासाठी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

(ज. र. मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत अग्रेषित -

१) अवर सचिव (कोषा प्रशा ३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त कृषी म. रा. तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, अमरावती.
४) संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याच्या पदावरील कार्यालय प्रमुख.
५) संबंधित अधिकाऱ्यांचे नियुक्तीच्या पदावरील कार्यालय प्रमुख.
६) संबंधित अधिकारी.
७) संबंधित अधिकारी वैयक्तीक नस्ती.
८) निवड नस्ती.